# सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका
## जलनि:सारण विभाग
## जाहिर प्रकटन क्र.०२ /२० - २१

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका जलनि:स्सारण विभागाकडे खालील कामगिरीसाठी शासन परिपत्रक क्र. जी.एस.टी. १०१७- प्र.क्र. ८१/कराधान-१ दि. १९/०८/२०१७ नुसार मा. आयुक्तसो, यांचे दि. २९/०८/२०१७ मान्यतेनुसार सुधारीत शर्ती व अटीस समावेश करुन अनुभवी इच्छुक मक्तेदार यांचेकडून दोन लिफाफा पध्दतीने निविदा दर मागविणेत येत आहेत.सदरच्या निविदा जलनि:सारण विभागाच्या बारनिषी मध्ये स्विकारले जाते.

| अ.क्र | कामाचा तपशिल | अंदाजित खर्च | बयाणा रक्कम | सुरक्षा अनामत रक्कम | निविदा फॉर्म फी | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | खणभाग धनगरगल्ली शाळा नं. १५ ते गणेशनगर भगतसिंग चौक पर्यंत ड्रेनेज लाईन चेंबरमधील गाळ काढणे. | १,४५,२७०/- | १,४६०/- | ७,२७०/- | १००/- | १५ दिवस |

वरील कामासाठी बयाणा रक्कम युनियन बँक ऑफ इंडीया सांगली येथील अकौट खाते क्र. ४२४२०२० १०५०२७०८

१) मध्येच भरुन त्याचे चलन निविदा फॉर्म सोबत जोडणेचे आहे.

२) संपूर्ण निविदा प्रक्रिया अर्ज विक्री, सादरीकरण व स्विकृती महापालिकेच्या जलनि:सारण विभाग सांगली व्दारे कार्यरत राहील.

३) निविदा संचाची विक्री महानगरपालिकेच्या जलनि:सारण विभाग सांगली मध्ये अधिकृत नोंदणी केलेल्या ठेकेदाराना प्रसिध्दीच्या दिनांक पासून युनियन बँक ऑफ इंडीया सांगली मध्ये फॉर्म फि भरलेचे चलन सादर केले नंतरच प्रसिध्दीच्या दिनांकापासून कोरे निविदा फॉर्म दि.०१/०६/२०२० रोजी दुपारी ०३ .०० वाजेपर्यंत देणेत येतील.

४) निविदा महानगरपालिकेच्या जलनि:सारण विभाग सांगली येथे दि.०१/०६/२०२० येथील बारनिशी मध्ये सायंकाळी ०५.०० वाजेपर्यत स्विकारण्यात येतील.

५) निविदा दि.०२/ ०६/२०२० रोजी सकाळी ११-०० वाजता निविदा कमिटी समोर उघडणेत येतील.

६) या निविदा बाबतच्या शर्ती अटी जलनि:सारण विभाग सांगली या ठिकाणी उपलब्ध आहेत.

७) कोणतीही निविदा स्विकारणेचा अथवा नाकारणेचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.

(एस.बी. सावंत)
**जलनि:सारण अभियंता,**
**जलनि:सारण विभाग, सांगली**
**सां.मि.आणि कु.महानगरपालिका**

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका
## जलनि:सारण विभाग, सांगली
## नविदा, शर्ती व अटी
## जाहिर प्रकटन क्र. ०२/२०२०-२१

**१) निविदा दोन लिफाफा पध्दतीने देणेची आहे.**

**(अ) नंबर १ चा लिफाफ्यामध्ये खालील प्रमाणे कागदपत्र असावेत.**

१) बयाणा रक्कम भरले चलन.

२) व्यवसाय कराचे अद्यावत नादेय प्रमाणपत्र.

३) स्थानिक संस्थाकर (LBT) प्रमाणपत्र सांगली मनपा

४) संबंधित मक्तेदार यांनी अशा प्रकारची केलेल्या कामाचे अनुभवाचे दाखले जोडने आवश्यक आहे

**(ब) नंबर दोनच्या लिफाफ्यामध्ये फक्त दर भरलेली निविदा असावी.**

निविदा सोबत युनियन बँक ऑफ इंडीया, सांगली येथे मनपा खाते क्र. ४२४२०२०१०५०२७०८ या मध्ये भरणा करून त्याचे चलन लिफाफा क्र.१ मध्ये स्कॅन करून जोडणेचा आहे. मूळ चलन निविदा उघडतेवेळी समक्ष सादर करणेचा आहे.

२) कोणतीही निविदा मंजूर अथवा नामंजूर करणेचा अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे. त्याबाबत कोणत्याही प्रकारचा खुलासा केला जाणार नाही.

३) निविदा फॅार्मच्या अनुषंगाने अंदाजपत्रके / इतर माहिती मक्तेदार यांनी संबंधीत विभाग प्रमुखा कडून घेणेची आहे.

४) आलेल्या निविदा दि. / / रोजी दुपारी ११.०० वा. महापालिके निविदा समिती समोर शक्य झाल्यास उघडणेत येतील. यावेळी संबंधीत मक्तेदारांनी उपस्थित रहावे.

५) बयाणा रक्कम चलन या स्वरुपातच स्विकारली जाईल.

६) इमारत व दळणवळण विभागाचे / कामगार कायदा / रॅायल्टी वगैरे तरतुदी बंधनकारक राहतील.

७) मक्तेदारास महापालिकेच्या कामासाठी बाहेरुन आणलेला मालावर जकात माफी दिली जाणार नाही.

८) कामगिरीस मशिनरी महापालिकेकडे उपलब्ध असलेस ठरवून दिलेल्या भाड्या प्रमाणे पुरविणेत येईल. जेव्हा महापालिकाकडे मशिनरी नसेल तेव्हा मक्तेदारांनी स्वत: बाहेरुन मशिनरी आणून कामगिरी पूर्ण करणेची आहे.

९) एस्टीमेंट मधील प्रत्येक बाबींच्या एकूण क्वांटीटी व अंदाजीत आहेत. प्रत्यक्ष केलेल्या कामाची मापे घेऊन बीले केली जातील.

१०) नकाशा व स्पेसीफिकेशन प्रमाणे आणि जलनि:सारण अभियंता / कार्यालयीन प्रमुख (पाणी पुरवठा व जलनि:सारण ) वेळोवेळी करतील ते हुकूम त्या पध्दतीने व तसे सर्व काम अगर कामाचा कोणताही भाग पुरा करण्याचा आहे. नकाशे व अंदाजपत्रक व कामाचे खुलासेवार वर्णन याच्या प्रती मंजूर मक्तेदारास दिल्या जातील.

२०) महापलिकेच्या जलनि:सारण अभियंता /कार्यालयीन प्रमुख (जलनि:सारण व पाणी पुरवठा विभाग ) किंवा त्यांच्या वतीने कोणत्याही जबाबदार व्यक्तीने पाया पसंत केल्याशिवाय तो भरता कामा नये. तसे जे काम भिंतीस जमिनीत किंवा इतर ठिकाणी झाकले जाऊन मागावून त्याची मापे घेता येणे शक्य नाही अशा तऱ्हेचे असेल तर ते झाकण्यापूर्वी मापे घेण्यासाठी मक्तेदाराने ४ दिवस आगोदर कळवले पाहीजे. यात हयगय झाल्यास मक्तेदाराने आपल्या स्वखर्चाने झालेले काम उघडे करुन दाखवले पाहीजे.

२१) कोणत्याही कारणासाठी मनपाच्या परवानगी शिवाय मक्तेदारास यादीतील काम दुसऱ्यास तबदिल करता येणार नाही.

२२) काम चालू असताना मक्तेदाराने अपघात टाळण्यासाठी जरुर ते दिवे लावले पाहीजेत, कुंपन केले पाहीजे / योग्य ती काळजी घेतली पाहीजे. यात हयगय झाल्यास अपघाताने झालेल्या नुकसानीस मक्तेदार जबाबदार राहील.

२३) महापालिकेच्या विभागप्रमुखाची परवानगी शिवाय रविवारी काम करता येणार नाही.

२४) कामावर वापरणारा कोणताही इसम योग्य रितीने काम करत नाही असे दिसुन आल्यास त्याला कामावरुन बंद केले जाईल.

२५) सर्व प्रकारच्या खाणीची फि, जकात कर, जमिन भाडे, रॉयल्टी सर्व प्रकारचे शासकीय कर मक्तेदाराने दिले पाहीजे.

२६) मक्तेदार आपणांस नादार ठरवून घेण्याचा न्यायालयामार्फत अगर अन्य रितीने प्रयत्न करील अथवा आपल्या धनकोषी तशा प्रकारे संगणमत करेल असे दिसून आल्यास कॉन्ट्रॅक्ट रद्द केले जाईल व शर्त नं. १७ प्रमाणे तजवीज केली जाईल.

२७) एखाद्या फर्मच्या भागीदारीचे निविदा दिले असल्यास फर्मच्या घटनेतील कोणताही बदल ताबोडतोब मक्तेदार यांनी महापालिकेस कळविले जाईल .

२८) कामावर एखाद्या इसमास दुखापत किंवा अपघात झाल्यास त्याची संबधीत जबाबदारी मक्तेदारावर राहील.

२९) वर्कमेन कॉम्पेनसेशन ॲक्ट खाली जर महापालिकेवर जबाबदारी बसली तर त्या जबाबदारीची रक्कम मक्तेदारा कडून वसूल केली जाईल.

३०) दुष्काळी अगर महागाईच्या काळी वाढीव मजूर महापालिकेने सांगीतल्यास मक्तेदाराने कामावर लावले पाहीजेत.

३१) कामावर लावलेली मजूरांची यादी महापालिकेने मागीतल्यास ती मक्तेदाराने दिली पाहीजे.

३२) कामाचा आरंभ करण्यास विलंब लावल्यास त्याबद्दल मक्तेदारास मोबदला मिळणार नाही.

३३) महानगरपालिकेने ठरवून दिलेलया मुदतीत काम पूर्ण झाले नाही तर दंडाची आकारणी खालील प्रमाणे केली जाईल.

४१) निविदा मधील करावयाच्या कामाचे दर शब्दात अकड्यात दिले पाहीजेत. चिरफाड झालेली खाडाखोड झालेली अटी नमुद केलेल्या सही नसलेले अगर नियमास अनुसरुन नसलेली निविदा विचारात घेतली जाणार नाहीत.

४२) मक्तेदारांने महापालिकेच्या कामासाठी मनपा हद्दीबाहेरुन आणलेल्या मालावर ऑक्ट्राय माफी दिली जाणार नाही.

४३) मक्तेदाराकडून जमा करुन घेणेत आलेली सुरक्षा अनामत रक्कम काम पूर्ण झालेल्या तारखेपासून सहा महिण्याने आदा करण्यात येईल.

४४) उक्त कामगिरीचे मटेरीअलचे (पाईप) तसेच कामगिरीचे बिला पोटी ८०% रक्कम देणेत येईल तसेच कामगिरी पूर्ण झाल्यावर एक महिना ट्रायल घेतले नंतर बिला पोटीची उर्वरीत २०% रक्कम देणेत येईल.

४५) उक्त कामगिरी करताना जरुर लागल्यास लाईनमधील पाणी अडवणेची जबाबदारी तसेच लाईन पुर्ववत चालू करणेची जबाबदारी मक्तेदारावर राहील त्याबाबत कोणताही आर्थिक मोबदला दिला जाणार नाही.

४६) वरील शर्ती व अटी शिवाय वरील कामगिरीशी निगडीत भारतीय मानांकानुसारच्या सर्व शर्ती व अटी मक्तेदारावर बंधनकारक राहतील.

४७) सदर कामामध्ये वापरणेत आलेले पाईप आय.एस. स्पेसिफिकेशन प्रमाणे असलेबाबतचा दाखला बिला सोबत जोडणे आवश्यक आहे.

४८) पाईप लाईन खुदाई करीत असताना संबंधीत मक्तेदाराकडून भारत संचार निगम लि. अथवा इतर खात्याची केबल तसेच मनपाची पाणी पुरवठयाची पाईप लाईन अथवा खाजगी पाणी कनेक्शन बाधीत झाल्यास त्याची आवश्यक ती दुरुस्ती संबंधीत मक्तेदारानी स्वखर्चाने करुन देणेची आहे. अन्यथा सदर नुकसान भरपाईची रक्कम संबंधीत मक्तेदाराच्या देय होणा-या बिलातून कपात केली जाईल आहे.

४९) नियमानुसार ईन्शुरन्स काढण्याची जबाबदारी मक्तेदार यांचेवर आहे अन्यथा प्रचलित दराप्रमाणे देयाकातून कपात करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

५०) नियमानुसार १ % कामागार कल्याण निधी देयकातून कपात करणेत येईल.

**जलनिःसारण अभियंता,**
जलनिःसारण विभाग,
सां.मि. आणि कु. शहर महानगरपालिका